*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

*मराठी विभाग आयोजित*

## मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने "मन की बात" विषयी पत्रलेखन स्पर्धा

दि.२९.९.२०१६

---

हुतात्मा राजगुरू महाविद्याल यातील मराठी वाङ्मय मंडळ आणि पुणे ग्रामीण डाक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात मधील विषयावर पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन **दि.२९.९.२०१६ रोजी महाविद्यालयात** करण्यात आले. या स्पर्धेत ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांना पंतप्रधानांद्वारा प्रसारित होणाऱ्या मन की बात कार्यक्रमांमधील विषयांशी परिचित करणे व या विषयावर विचार करायला प्रवृत्त करणे हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश होता. या पत्रलेखन स्पर्धेसाठी १)यांत्रिक युगातील माणसाच्या भविष्यातील सांगड २)लोकशाही ही आपली ताकद आहे व आपण एकत्रितपणे ती अधिक बळकट करु शकतो ३)आपले ध्येय निश्चित करा व टेंशन फ्री माईंडने साध्य करा ४) भारताचे स्वच्छतेचे एक पाऊल - प्रधानमंत्रीद्वारा स्वच्छतेची चळवळ ५)स्टार्टअप इंडियासाठी भारतात असंख्य संधी उपलब्ध ६) विविधतेमध्ये भारताची शक्ती एकवटली आहे ७) सकारात्मक विचार व एकजुट आपली सर्वात मोठी ताकद आहे असे विषय होते.

या पत्रलेखन स्पर्धेतील विजेत्यांना डाक विभागातर्फे पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेत सहभागी विध्यार्थ्यांना डाक विभागातर्फे आंतरदेशीय पत्र व लेखन सामग्री उपलब्ध करून देण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ एस बी पाटील , मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. राजेंद्र शिरसी , डाक विभागाचे सहायक अधिक्षक एस. डी. मोरे , डाक आवेक्षक एस. एस. मिरजे, पोस्टमन मंगेश पाचंगे, यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख



पत्रलेखन स्पर्धेप्रसंगी उपस्थित
डाक आवेक्षक एस. एस. मिरजे, पोस्टमन मंगेश पाचंगे व विद्यार्थी



पत्रलेखन स्पर्धेप्रसंगी उपस्थित मराठी वाङ्मय मंडळ
प्रमुख डॉ. संजय शिंदे व डॉ. राजेंद्र शिरसी,



माय पुणे जिल्हा उत्तर ५ पुढारी | पुणे, रविवार
२ ऑक्टोबर २०१६

# ‘मन की बात’ विषयावर राजगुरू महाविद्यालयात पत्रलेखन स्पर्धा

राजगुरुनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आणि पुणे ग्रामीण डाक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात'मधील विषयांवर पत्रलेखन स्पर्धेचे गुरुवारी (दि. २९) आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना पंतप्रधानांद्वारा प्रसारित होणाऱ्या 'मन की बात' कार्यक्रमांमधील विषयांशी परिचित करणे व या विषयावर विचार करायला प्रवृत्त करणे हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश होता.

या पत्रलेखन स्पर्धेसाठी यांत्रिक युगातील माणसाच्या भविष्यातील सांगड, लोकशाही ही आपली ताकद आहे व आपण एकत्रितपणे ती अधिक बळकट करु शकतो, आपले ध्येय निश्चित करा व टेंशन फ्री माईंडने साध्य करा.

भारताचे स्वच्छतेचे एक पाऊल - प्रधानमंत्रीद्वारा स्वच्छतेची चळवळ, स्टार्टअप इंडियासाठी भारतात असंख्य संधी उपलब्ध, विविधतेमध्ये भारताची शक्ती एकवटली आहे आणि सकारात्मक विचार व एकजूट आपली सर्वात मोठी ताकद आहे, असे ७ विषय होते. या पत्रलेखन स्पर्धेतील विजेत्यांना डाक विभागातर्फे पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना डाक विभागातर्फे आंतरदेशीय पत्र व लेखनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डाक विभागाचे सहायक अधीक्षक एस. डी. मोरे, डाक आवेक्षक एस. एस. मिरजे, पोस्टमन मंगेश पाचंगे, डॉ. संजय शिंदे, डॉ. राजेंद्र शिरसी यांनी केले.

डॉ. बी.डी.अनुसे
मराठी विभाग प्रमुख